# महात्म्याशी भेट

डॉ. अभय बंग

“तुम्ही खरंच त्यांना प्रत्यक्ष भेटलात ?”

माझं बालपण महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमात गेलं हे कळलं की अनेक जण अुत्सुकतेने हा प्रश्न विचारतात. मी काय अुत्तर द्यावं ? माझा जन्मच मुळी त्यांच्या मृत्यूनंतर झाला. त्यामुळे ज्यांनी गांधीजींना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही अशा सहा अब्ज लोकांपैकी मी ही अेक. पण मी त्यांना जवळपास रोजच भेटतो. ते आपले आजोबा असावेत आणि त्यांचंच रक्त आपल्या शरीरात धावत असावं असं मला जाणवत राहतं. माझ्या प्रत्येक कृतीकडे ते आपल्या मिशाळ स्मितासह वात्सल्याने पण अपेक्षेने बघत असतात. मी चूक वर्तन केलं तर क्रूसावर गांधी चढत असतो. जेव्हा जेव्हा गंभीर निर्णयाचा क्षण माझ्या जीवनात येतो तेव्हा मी त्यांनाच भेटून विचारत असतो, “बापू, मी आता काय करु ?”

महात्म्याशी अशा झालेल्या काही भेटींच्या या आठवणी. आठवणी व्यक्तिगत आहेत. आणि सार्वत्रिकही.

x x x x x

२ आक्टोबरला गांधी-जयंती कशी साजरी करावी ? आरत्या, खिरापती व मिठाई वाटून ? पण ‘गरीबातल्या गरीब माणसासोबत अेकरुप व्हा’ हा गांधीजींचा संदेश आणि ‘स्वकष्टाने कमावलेल्या भाकरीवरच तुला अधिकार आहे’ हे त्यांचं तत्व.

आश्रमातील शाळेत गांधी जयंतीला दरीद्रनारायणाशी अेकरुप व्हायचा श्रमोत्सव चालायचा. “आज दिवसभर अुपाशी राहून शेतकऱ्यासारखं शेतात परिश्रम करुन किंवा चरख्यावर सूत कातून स्वतः कमावलेल्या मजुरी अेवढंच अन्न संध्याकाळी आज आपल्याला मिळणार.” संध्याकाळपर्यंत हातांना फोड आलेले होते. घामाने चिंब अंग ठणकत होतं. पोटात भुकेचा डोंब. पण मजुरी थोडी निघाली. त्यात किती खायला मिळणार? जेव्हा त्या लहानशा भाकरीने माझ्या भुकेच्या ताटाचा अेक कोपराही भरला नाही तेव्हा भूक म्हणजे काय, कुपोषण म्हणजे काय, मजुरांची मजुरी आणि शेतकऱ्याच्या श्रमाचं मूल्य किती असायला हवं या सर्व ब्रह्मप्रश्नांशी प्रत्यक्ष भेट झाली. वस्तुतः माझ्या पुढील आयुष्यात समाजसेवा म्हणून ज्या प्रश्नांवर मी काम केले त्या पैकी अनेकांशी माझी पहिली भेट गांधी-जयंतीला झाली.

या दरीद्री देशात प्रत्यक्ष परमेश्वरालाही भाकरीच्या रुपातच दर्शन द्यावं लागेल. असं गांधीजी म्हणालेच होते.

x x x x x

हाफपँट घालून दोन मुलं सायकलने वर्धा जिल्ह्यातल्या पिपरी गावाकडे जात होते. सोळा वर्षांचा माझा मोठा भाऊ अशोक व तेरा वर्षांचा मी. आम्ही दोघेही तेव्हा सेवाग्राम मधे गांधीजीनी सुरु केलेल्या 'नयी तालीम' पध्दतीच्या शाळेत शिकत होतो. अशोकने सायकल थांबवली. "आता आपण मोठे झालो आहोत. आपल्या जीवनाचं काय करायचं हे आपण ठरवायला हवं" असं तो म्हणाला. मी मान डोलावली. आताच्या भाषेत, 'कोणतं करीअर निवडावं ?' याबद्दल आम्ही दहा मिनिट सखोल चर्चा केली. सगळ्यात दुःखी, कष्टी, असहाय खेड्यातील लोक होते. त्यांच्या पोटात भूक व अंगावर जखमा व रोग होते. आमच्या पैकी अेकाने खेड्यातील शेती सुधारावी व दुसऱ्याने आरोग्य सुधारावे असे आमचे ठरले. अशोक म्हणाला - मी शेती सुधारतो. त्यामुळे आरोग्याची जबाबदारी माझ्यावर आली. पुढे अशोक कृषितज्ञ झाला. विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्याची शेती कशी सुधारता येईल या विषयावर तो आयुष्यभर काम करतो आहे. पदरी पडल्यानुसार मी डॉक्टर झालो. पुढे गडचिरोलीला आलो. 'आरोग्य-स्वराज्य' कसं निर्माण करावं हाच माझा आयुष्यभराचा शोध झाला.

आम्ही दोघांनी जेव्हा त्या दिवशी नियतीशी हा करार केला तेव्हा रस्त्याच्या त्या वळणावर बाजूला महात्मा कौतुकाने बघत अुभा होता. केव्हातरी तो म्हणाला होता - "मी तुम्हाला जादूचा तावीज देतो. 'काय निर्णय घेअू' असा प्रश्न जेव्हा पडेल तेव्हा जीवनात पाहिलेल्या सर्वात दुःखी, निर्बल माणसाचा चेहरा डोळ्यासमोर आणा."

x x x x x

अलाहाबादला गांधीजी पहिल्यांदाच नेहरुंकडे आनंदभवन मधे आलेले होते. तरुण जवाहर स्वतः त्यांची खातिरदारी करीत होते. सकाळी गांधींजी तोंड धूत जवाहरशी गप्पा मारत होते. बोलता बोलता बराच वेळ पाणी अुगाच सांडत राहिलं. गांधीजी अचानक भानावर आले व पाणी वाया घालवल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. तरुण गर्भश्रीमंत जवाहर हसत म्हणाले, "बापू, काही काळजी करु नका. हे अलाहाबाद आहे ; अिथे गंगा व यमुना दोन्ही वाहतात."

"हो जवाहर. मला माहित आहे. पण गंगा-यमुना माझ्यासाठी वाहत नाहीत."

पर्यावरण चळवळ सुरु होण्याच्या किमान पन्नास वर्षे अगोदर गांधींना हे भान होतं की नैसर्गिक संपदा मानवाने अनिर्बंध अुधळण्यासाठी नाही. तिला स्वतःचं पवित्र अस्तित्व आहे आणि मूल्यही आहे. आवश्यक तेवढीच वापरा. आपल्या गरजा कमी करा.

ही आठवण वाचली तेव्हा मी नुकताच नागपूरला मेडिकल कॉलेजमधे प्रवेश घेतला होता. मी अुठलो. खोलीतला विजेवर चालणारा पंखा बंद केला. पंख्याविना मला जगता आलं पाहिजे. वैद्यकीय शिक्षणाची पुढील पाच वर्षे नागपूरच्या अुन्हाळयातही मी पंख्याविना काढली. जणु पुढे गडचिरालीला जाण्यासाठी पूर्वतयारी झाली.

x x x x x

गडचिरोलीतील वास्तव्याच्या दुसऱ्या वर्षी अेक प्रसंग घडला. गावाबाहेरील अेका घरात तेव्हा आम्ही राहत होतो. बाजूला ओसाड जागा. तिथे हिवाळ्यात काही भटक्या लोकांनी आपली पालं टाकली होती. अेका रात्री प्रचंड गोंधळ, किंकाळ्या व रडारड अैकू येत राहिली. दारुच्या नशेत नवऱ्याने बायको-मुलांना हाणमार करुन आपलं पाल व त्यातील चीजवस्तु पेटवून दिली आणि पळून गेला. सकाळी अुठून पाहिलं. राखेच्या ढिगाऱ्यासमोर मार खाल्लेली, कपडे फाटलेली अेक आई आणि तिची भेदरलेली सात मुलं थंडीत थरथर कापत अुभी होती.

राणीने तिला पांघरुण व खायला दिलं. मला त्या रात्री झोप येईना. कितीतरी बायांना दारुमुळे असा त्रास होतो. ही समस्या कशी सोडवावी ? "पण हे तुझं काम नाही. दारुचा प्रश्न भयानक आहे. दारुचे गुत्तेदार, स्थानिक राजकीय नेते व राज्य सरकार सर्वच या व्यापारात गुंतलेले आहेत. तू डॉक्टर आहेस. तू यात काय करशील ? हा राक्षस फार मोठा आहे. तू आपले रोगी बघ. संशोधन कर."

पण त्या मार खाल्लेल्या आईचे डोळे ? तिची भेदरलेली मुलं ? विसरता येईना. यांना सोडून कसं पळता येईल ?

गांधीजींनी काय केलं असतं ? शोधू लागलो. "मला अेक तासासाठी हिंदुस्थानचा हुकुमशहा बनवलं तर सर्वात प्रथम मी सर्व दारुची दुकाने व परवाने रद्द करीन."

वा! या प्रश्नावर गांधी आपल्यासोबत आहेत. हिंमत वाढली. त्यांनी काय केलं होतं ? चक्रवर्ती राजगापालाचारींना या प्रश्नाची जबाबदारी देअून शासकीय आकडेवारी मिळवली होती. त्यावेळी अख्ख्या भारतात इंग्रज सरकारला दारु विक्रीपासून दरवर्षी २५ कोटी रुपये कर मिळत होता. गांधीजींनी दारु विरुध्द लोकशिक्षण व दुकानांवर पिकेटिंग सुरु केलं.

मार्ग सापडला. गडचिरोलीची आकडेवारी गोळा केली. जिल्ह्याच्या विकासाचं बजेट १४ कोटी रुपये व दारुचा अेकूण खप २० कोटी रुपये आढळला. गरीबीचं अेक कारण या दारुच्या अर्थशास्त्रात सापडलं. दारु दुकानांविरुध्द पिकेटिंग सुरु झाले. गावागावात लोकांनी 'गावाची दारुमुक्ती' लागू केली. राज्य सरकारला न जुमानता २ आक्टोबर १९९२ पासून जिल्ह्यात 'जनतेची दारुमुक्ती' सुरु करण्यात आली. गडचिरोलीच्या जंगलात गांधी आमच्या सोबत लढत होता. "अन्यायी सत्तेशी टक्कर देण्यासाठी तुम्ही हातात दगड किंवा बंदुक घेण्याची गरज नाही. अेकच छोटीशी कृती करा. त्या राक्षसाकडे पाठ फिरवा व त्याची आज्ञा पाळण्यास नकार द्या. तुम्ही बघाल की तुमच्या नकारापुढे तो राक्षस हतबल आहे. तो शेवटी गुडघे टेकून तुम्हाला शरण येईल."

पाच वर्षे आंदोलनानंतर शेवटी १९९३ साली सरकारने पूर्ण जिल्ह्यात दारुबंदी लागू केली. पहिल्याच वर्षी जिल्ह्यातली ६० टक्के दारु कमी झाली. लोकांचे १२ कोटी रुपये वाचले. घराघरातल्या भेदरलेल्या अुपाशी बाया व मुलांच्या पोटात अन्न पोचलं.

पण समस्या अजून संपलेली नाही. या वर्षी पूर्ण महाराष्ट्रत दारु विक्रीपासून शासनाला ४००० कोटी रुपये अुत्पन्न अपेक्षित आहे. कोण कृती सुरु करणार ?

x x x x x

दक्षिण अफ्रिकेत गेलो तेव्हा जिथे जिथे गांधी राहिले, घडले तिथे जाऊन आलो. गांधींच्या जीवनातील टर्निंग पाइंट ठरलेल्या पीटर-मरिट्झबर्गला गेलो. जवळपास शंभर वर्षांपूर्वी  नुकत्याच अफ्रिकेत आलेल्या बॅरिस्टर गांधींना याच स्टेशनवर ट्रेनमधून खाली फेकून देण्यात आलं होतं. रात्रभर अपमान, थंडी व भीती अनुभवत गांधी त्या प्लॅटफॉर्मवर बसून होते. “हा भयानक देश आहे. अिथे कशाला राहायचं ? भारतात परत जाअू का ?”

अिथेच गांधींचा पळून न जाता लढण्याचा निश्चय झाला. अिथेच त्यांनी आपला सत्याग्रह केला व गोऱ्या लोकांसोबत ट्रेनने प्रवास करण्याचा आपला हक्क मिळवला. माझ्यासाठी ही जागा काशीहून पवित्र. कुरुक्षेत्र!

या घटनेला शंभर वर्षे पूर्ण झालीत तेव्हा या रेल्वे प्लॅटफॉर्मवर गांधीजींच्या स्मृतीत मोठा हॉल बनवण्यात आला. १९९६ साली त्या हॉलचं अुद्घाटन करतांना नेल्सन मंडेला म्हणाले, “शंभर वर्षांपूर्वी भारताने आमच्याकडे अेक अडखळणारा शिकाअू वकील पाठवला. वीस वर्षांनंतर आम्ही भारताला अेक महात्मा परत केला.”

प्रत्येकाच्या जीवनात अेक पीटर-मॅरिट्झबर्ग घडत असतं. अडखळणाऱ्या तरुणापासून महात्म्याच्या दिशेने प्रवास तेव्हा सुरु होअू शकतो.

आपण अजून प्लॅटफॉर्मवर बसून आहोत.

(डॉ. अभय बंग यांनी २००० साली इंग्लंडमधे दिलेल्या ‘Meeting the Mahatma’ या भाषणावर आधारित.)

— — —